लिथुआनियन
लोककथा

सूर्यबाळमाशी आणि तिचा रक्षक

सूर्यकुमारी आणि तिचा रक्षक

लिथुआनियन लोककथा

चित्रे: अल्बीना मकुनायते

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई

रादुगा प्रकाशन
मॉस्को

अनुवादक : सु. मुंडळे
सजावट : अल्बीना मकुनायते
कथाकथन : आल्दोन ल्योबूते
लेखक : युर्गीस दोविदायतीस

ОСВОБОДИТЕЛЬ СОЛНЦА
Литовская народная сказка
На языке маратхи

THE SUN PRINCESS AND HER DELIVERER
A Lithuanian Folk Tale
In Marathi

© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८९

ISBN 5-05-002190-1

सोविएत संघात मुद्रित

फार फार वर्षांपूर्वी एक राजा आणि राणी रहात होते. त्यांना एक मुलगा झाला. त्याला ते प्राणांपलिकडे जपत. राजकुमार दिसामासाने वाढू लागला, त्याला खाण्यासाठी अत्युत्तम पदार्थ आणि सोन्या-चांदीने मढवलेले कपडे होते. त्याच्या हाकेसरशी नोकर-चाकर सेवेला हजर होत. आणि त्याच्या आई-वडिलांनी, जर त्यांना शक्य असते, तर सूर्याला सुद्धा त्याच्यासाठी गाळणीतून धरून आणले असते. पण राजकुमार नेहमी खिन्न असायचा. तो उदास मनाने देवाला दोष देत राजवाड्याभोवतालच्या बगीचात येरझारा घालीत असे. तो नेहमी आईला विचारी:

"मी या जगात एकटाच कसा ग? मला ना भाऊ,

ना बहीण, मी खेळावं कुणाबरोबर, गप्पा तरी कुणाशी माराव्या ?"

यावर नजर खाली घालण्याशिवाय राणीपाशी काहीच उत्तर नसे.

राजवाड्याजवळील पटांगण ऐशी फूट उंचीच्या दगडी भिंतींनी वेढलेले होते. भिंतीला सोनेरी मुलामा होता. आणि तिच्यावर धारदार हिरे जडवलेले होते. भिंतीच्या आसपासही फिरकू नये अशी राजकुमाराला सक्त ताकीद देण्यात आली होती, आणि या ताकीदीमुळे भिंतीपलीकडे काय आहे हे बघण्याची राजकुमाराला उत्सुकता लागून राहिली होती.

एके दिवशी एक डोंबकावळा भिंतीच्या टोकावर येऊन बसला. राजकुमाराने कावळ्याला मारण्यासाठी आपल्या धनुष्यावर बाण चढवला, आणि तो बाण सोडणार एवढ्यात कावळा माणसाच्या आवाजात राजकुमाराशी बोलू लागला :

"हे राजकुमारा, मला मारू नकोस. मी तुला एक गुपित सांगणार आहे. या भिंतीपलीकडे गुलाब, लीली इ. फुले असलेला सुंदर बगीचा आहे. त्या बगीचातील राजवाड्यात तुझ्या तिन्ही बहिणींना कोंडून ठेवलेले आहे. तुला जर त्यांना भेटायचे असेल तर तू राणीच्या शय्यागृहातील फुलदाणीखालची सोनेरी किल्ली मिळव."

त्याच रात्री सर्वजण झोपी गेल्यावर, राजकुमार गुपचुप उठला आणि चोरून राणीच्या शय्यागृहात शिरून त्याने फुलदाणीखाली असलेली सोनेरी किल्ली मिळवली.

अंधारातच भिंतीतील गुप्त दरवाजा त्याने शोधून काढून उघडला आणि तो बागेत पोहोचला. तेथे त्याने त्याच्या



बहिणींच्या वाड्याची खिडकी उघडली. त्याच्या बहिणींनी त्याच्यापुढे हात पसरले आणि त्याचे मुके घेतले. त्यांना त्याने बाहेरील ताज्या हवेचा प्रसन्नपणा मिळवून दिल्याबद्दल त्यांनी त्याचे परत परत आभार मानले.

पण क्षणार्धातच भूकंप होऊन पृथ्वी हलल्यासारखी झाली आणि धुराड्यातून धुराचा लोट निघावा तसा हवेत धुळीचा काळा लोळ उठला. तिन्ही बहिणी वावटळीच्या तडाख्यात बाहेर फेकल्या गेल्या. आणि यासाठी आपणच सर्वस्वी जबाबदार आहोत म्हणून स्वतःच्या मूर्खपणाला दोष देत राजकुमार बहिणींच्या नावाने केविलवाणेपणाने आक्रोश करू लागला.

सकाळी डबा तयार करून राणी तिच्या मुलींच्या राजवाड्याकडे जायला निघाली. त्यासाठी तिने किल्लीची शोधाशोध केली, परंतु तिला किल्ली सापडेना. ती राजकुमारींच्या राजवाड्याकडे धावली पण राजवाडा रिकामाच होता. जोरजोराने हुंदके देत, राणी आक्रंदू लागली: "हाय रे दुर्दैवा, माझ्या मुलींना राक्षसाने नेलं आहे, आता मी त्यांना कधीही पाहू शकत नाही."

ही बातमी ऐकताच राजाचा राग अनावर झाला. त्याच्या नोकर-चाकरांची आणि दासदासींची भीतीने गाळण उडाली. आपल्या वडिलांचे नोकर, चोर सोडून सन्याशाला फाशी दिल्याप्रमाणे निरपराधी लोकांना पकडून शिक्षा करताहेत असे बघून राजकुमार वडिलांकडे गेला व भीतीने थरथरत त्यांना म्हणाला:

"बाबा, माझ्या बहिणींविषयी जे काही घडलं आहे, त्याला सर्वस्वी मीच जबाबदार आहे. तर तुम्ही मला शिक्षा करावी."

राजाचा चेहरा काळा पडला. तो रागाने जळफळाट करीत म्हणाला :

"तुझ्या जन्मापूर्वी भविष्य वर्तवणाऱ्या ज्योतिषांनी मला ताकीद दिली होती की, तुझ्या बहिणींना राक्षस घेऊन जाणार आहे. म्हणूनच मी ऐशी फूट उंचीची भिंत बांधून त्यांना राजवाड्यात बंदिस्त ठेवलं होतं. परंतु तू माझ्या आज्ञांचे उल्लंघन करून माझी अवज्ञा केलीस. म्हणून नालायक मुला, तू आताच माझे राज्य सोडून चालता हो, आणि तुझ्या बहिणींना परत आणल्याशिवाय तोंड दाखवू नकोस."

राजाने स्वतः राजवाड्याचा दरवाजा उघडून राजकुमाराला बाहेर हाकलून दिले.

आपणाला कुठे जायचे आहे आणि काय करायचे आहे याचा काहीच थांगपत्ता नसलेला राजकुमार अनोळखी दिशेने चालू लागला.

अशा प्रकारे तो कित्येक दिवस चालत राहिला.. अखेरीस तो विचित्र अशा प्रदेशात पोहोचला. तेथे त्याला एक जुनाट झोपडी दिसली. एका म्हातारीने उंबरठ्यावरूनच त्याला विचारले की, तो कुठे चालला आहे? राजकुमाराने तिला स्वतःच्या बहिणींची गोष्ट सांगितली. त्यावर म्हातारी उत्तरली :

"मुला, तुझा मार्ग फार दूरचा आणि कठीण आहे, तुझे हात अशक्त असून त्यांना काम करण्याची सवय नाही. तुझं मन कोवळं आणि भित्रं आहे. तू माझ्याबरोबर तीन वर्षं राहून स्वतःचा चरितार्थ मिळवायला शिक आणि नंतरच मी तुला मदत करू शकेन."

राजकुमार म्हातारीबरोबर राहू लागला. त्याने झाडे

उपटली, शेते नांगरली.

तीन वर्षे एका दिवसासारखी भुर्रकन उडून गेली. म्हातारीने राजकुमाराला बोलावून सांगितले:

"उद्या तू तुझ्या बहिणींना शोधण्यासाठी निघू शकतोस. हा सुती चेंडू जवळ ठेव. तो जिकडे गडगडत जाईल, तिकडे तू चालत जा. आणि हा पावाचा तुकडा घे. तुला जेव्हा भूक लागेल तेव्हा त्यातून कितीही खाल्लं तरी तो कधीच संपणार नाही."

राजकुमाराने म्हातारीचा निरोप घेऊन तो परत पुढील प्रवासासाठी निघाला. चालता चालता तो एका तांब्याच्या डोंगरापाशी येऊन पोहोचला. त्या डोंगरावरील सर्व जंगल-ही तांब्याचेच होते. स्वत:साठी सोटा बनवावा म्हणून एका झाडावर चढून राजकुमार एक फांदी तोडू लागला. तोच आकाशातून एक चेटकीण उडत क्षणार्धातच त्याच्या समोर उभी ठाकली.

राजकुमाराने सुती चेंडू तिच्या डोळ्यांमधून फेकला, त्याला पकडण्यासाठी चेटकिणीने इतक्या जोरात धाव ठोकली की, तिचे डोके तांब्याच्या झाडावर आपटून त्यातून ठिणग्या पडल्या आणि त्यातून सावरण्यासाठी ती धापा टाकू लागली. या संधीचा फायदा घेऊन राजकुमार तांब्याचा डोंगर चढून वर गेला. डोंगराच्या शिखरावरील तांब्याच्या राजवाड्यातील खिडकीत एका गरगर फिरणाऱ्या चाकाजवळ त्याची मोठी बहीण बसलेली त्याला दिसली. तिने त्याला ताबडतोब ओळखले आणि त्याचे प्रेमाने स्वागत केले. परंतु जसजशी संध्याकाळ होऊ लागली तसतशी तिला काळजी वाटू लागली. आणि तिने राजकुमाराला लपवले. जंगलातील झाडे गुणगुणू लागली, तांब्याची



पाने कचकच वाजू लागली आणि एक बहिरीससाणा उडत राजवाड्यापाशी आला. त्याने आपली पिसे टाकून दिली आणि त्याचे सुंदर तरुणात रूपांतर झाले. घरात सोटा बघून तरुणाने त्याच्या बायकोला विचारले की, त्याच्या झाडांना हात लावण्याची हिंमत कोणी केली? तिने त्याला इकडच्या तिकडच्या गप्पा सांगून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी विचारले:

"जर माझा भाऊ मला भेटायला आला तर तुम्ही काय कराल?"

"मला त्याला बघून आनंदच होईल."

तेव्हा तिने लपवलेल्या राजकुमाराला बाहेर बोलावले. बहिरीससाण्याने अत्यानंदाने त्याचे स्वागत केले आणि आपल्या दैवाला दोष देत आपली कर्मकहाणी त्याला ऐकविली. त्याने सांगितले की, अजून सहा वर्षांपर्यंत त्याला बहिरीससाणा होऊन रहायला लागणार आहे. चेटकिणीने त्याला जादूने बहिरीससाण्याचे रूप दिले आहे आणि फक्त सूर्यकुमारीच त्याला या रूपातून मुक्ती देऊ शकते.

राजकुमार म्हणाला: "मी ते कार्य करीन."

"त्यात तू मृत्यूलाच आमंत्रण देशील. भाऊ, पुष्कळशा शूर लोकांनी राजकुमारीच्या राजवाड्यात घुसण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यातून कुणीही परत येऊ शकला नाही."

राजकुमाराने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. बहिरीस-साण्याने त्याला एक रुमाल भेट दिला आणि सांगितले:

"जेव्हा तुझ्यावर संकट येईल, त्यावेळेस हा रुमाल पसर आणि बघ, काय होईल."

राजकुमाराने बहिरीससाण्याचे आभार मानले आणि

तो म्हातारीने दिलेल्या सुती चेंडूमागे चालू लागला. चालता चालता तो चांदीच्या जंगलाने वेढलेल्या चांदीच्या पर्वतावर आला. त्याने सोटा बनविण्यासाठी चांदीच्या झाडाची फांदी तोडायला सुरुवात करताच जंगलाचे रक्षण करणाऱ्या दोन चेटकिणी पानांचा सळसळाट करत क्षणार्धात त्याच्या अंगावर धावून आल्या. त्यासरशी त्याने म्हातारीने दिलेला चेंडू त्यांच्यामधे फेकला, त्याच्यावर त्या दोघी तुटून पडल्या व त्यांची टक्कर होऊन त्या बेडकासारखा आवाज करीत जमिनीवर पडल्या. राजकुमार धावतच चंदेरी पर्वतावर चढला. त्या पर्वतावरील चांदीच्या राजवाड्यातील खिडकीत बसून त्याची मधली बहीण विणकाम करीत होती. तिने त्याला अत्युत्तम अन्न आणि पेय देऊन त्याचे स्वागत केले. त्याचे जेवण झाल्यावर ती अत्यंत दुःखी झाली व खिन्न मनाने त्याला म्हणाली:

"भाऊ, मला फार वाईट वाटतं की, तू माझ्याबरोबर जास्त वेळ राहू शकणार नाहीस, कारण माझा अस्वल-नवरा आल्यावर तुला ओरबाडून मारून टाकेल."

"ताई, तू भिऊ नकोस. मी त्याच्यापासून लपून राहीन."

संध्याकाळ होताच धरणी थरथर कापू लागली. एक मोठे अस्वल राजवाड्याकडे धावत येऊ लागले. त्याने अस्वलाची कातडी टाकून दिली आणि त्याचे सुंदर तरुणात रुपांतर झाले. महालात चांदीचा सोटा बघताच त्याने बायकोला दरडावून विचारले:

"इथं कोण आलं होतं?"

"माझा भाऊ मला भेटायला आला होता. तो त्याचा सोटा इथं विसरून गेला."



"तो माझ्यासाठी का थांबला नाही?"

"तुम्ही त्याला ओरबाडून मारून टाकाल अशी मला भीती वाटली. मी त्याला परत पाठवून दिलं. परंतु अजूनही मी त्याला रस्त्यात गाठून माझ्या चुकीची दुरुस्ती करू शकते."

तिने ओट्यावर जाऊन भावाला हाक मारताच तो लपलेल्या जागेवरून बाहेर आला. त्याने आणि अस्वलाने हस्तांदोलन करून एकमेकांची दुःखे सांगायला सुरुवात केली. मधल्या बहिणीच्या नवऱ्याला दुष्ट चेटकिणीने जादूने अस्वलाचे रूप दिले होते. आणि जर सूर्यकुमारीने त्याला पूर्वीचे रूप दिले नाही तर अजून चार वर्षे त्याला याच स्थितीतून जावे लागणार.

राजकुमार म्हणाला: "मी सूर्यकुमारीकडे जाऊन तुला मदत करण्याविषयी तिला सांगेन."

अस्वल उसासे टाकत म्हणाला:

"ते तेवढे सोपे नाही, पण तुला प्रयत्न करायला हरकत नाही. आणि त्यासाठी योग्य त्या प्रकारची मदत मी तुला करीन. हे जादूचे भांडे घे. यातील लापशी तुला हव्या त्या जागेवर टाक. त्या जागेला जो कुणी स्पर्श करील तो त्याच जागेवर चिकटून राहील."

राजकुमार पुढील प्रवासाला निघाला. सुती चेंडू घरंगळत एका समुद्राच्या किनारी पोहोचला. त्या समुद्राच्या मध्यभागी एक बेट होते. आणि त्या बेटावर एक सोनेरी राजवाडा होता. राजकुमार सुती चेंडूमागे जोराने पोहत थोडाही विलंब न लावता बेटाच्या किनाऱ्यावर पोहोचला. तेथील सर्व जंगल सोनेरी होते. परंतु तेथे सोनेरी झाडाखाली दलदलीची जमीन व भेसूर दिसणाऱ्या चेटकिणींचे थवेच्या

थवे होते. राजकुमार एका सोनेरी झाडावर चढला आणि त्याने आपल्या जवळील जादूच्या भांड्यातील लापशी त्या झाडाच्या खोडाला लावून ठेवली. झाडावर कोण बसले आहे हे बघण्यासाठी चेटकिणी जाताच त्यांची सर्वांची नाके झाडाच्या बुंध्याला चिकटली. तेव्हा राजकुमार सरळ सोनेरी राजवाड्यात पोहोचला आणि त्याला त्याची छोटी बहीण दिसली. त्या दोघांना एकमेकांना बघून अत्यानंद झाला, गप्पागोष्टींमध्ये वेळ कसा निघून गेला ते त्यांना कळलेच नाही. परंतु काही वेळानंतर बहिणीचा चेहरा काळजीने काळवंडला व ती भावाला म्हणाली :

"लवकरच माझा नवरा-पाईक मासा येईल."

राजकुमारने लपण्याचे वचन दिले.

समुद्राच्या लाटा सोनेरी राजवाड्याच्या खिडक्यांपर्यंत पोहचू लागल्या. राजवाडा हालू आणि हादरू लागला. एक मोठा पाईक मासा पाण्यातून उडी मारून बाहेर आला. त्याने आपले खवले टाकले आणि त्याचे सुंदर तरुणात रूपांतर झाले. आपल्याकडे कोण पाहुणा आला होता अशी त्याने बायकोकडे विचारणा केली.

त्याच्या बायकोने भावाला बोलावताच तो ताबडतोब आला.

त्यांनी टेबलाभोवती बसून पंचपक्वान्नांवर ताव मारला आणि खूप गप्पा मारल्या. त्यांच्यातील हे चैतन्यमय वातावरण जास्त वेळ टिकले नाही. शेवटी पाईक मासा खिन्न आणि उदास मनाने म्हणाला :

"मला क्षमा कर, माझ्या मित्रा, आता आपणास एकमेकांपासून अलग व्हावेच लागेल : आता मध्यरात्र

होऊन गेली आहे आणि आता माझे माणसातून माशात रूपांतर होईल. तीन वर्षांपर्यंत मला याच अवस्थेतून जावे लागेल. आणि फक्त सूर्यकुमारीच मला यातून सोडवू शकेल."

"कितीही अडचणी आल्या तरी मी सूर्यकुमारीकडे जाईन." राजकुमार म्हणाला.

पाईक मासा म्हणाला:

"सूर्यकुमारीकडे गेलेला कुणीही अजूनपर्यंत परत आलेला नाही तरी सुद्धा मी तुला तिच्याकडे जाण्यापासून परावृत्त करणार नाही. मी तुला हा सोनेरी करंडा भेट म्हणून देत आहे. जेव्हा तू संकटात सापडशील तेव्हा हा करंडा उघड."

आणि पुन्हा राजकुमार सूर्यकुमारीचे राज्य शोधण्यासाठी सुती चेंडूमागे आपला पुढील मार्ग आक्रमू लागला. शेवटी तो सूर्याच्या उज्ज्वल वाड्यापर्यंत पोहोचला. राजवाड्याच्या दरवाजाजवळ वाड्याच्या सुरवातीलाच दोन आगीचे खांब होते व त्यातून कुणीही जिवंतपणे आत जाणे शक्य नव्हते. परक्या व्यक्तीच्या नुसत्या जाणीवेने ते एकत्र येत व क्षणार्धात तिला जाळून कोळसा करीत. राजकुमाराने आपला सुती चेंडू दोन्ही खाबातून आत सोडताच दोन्ही खांब चेंडूवर आले आणि क्षणार्धात ते एकमेकांपासून विलग झाले. राजकुमार त्यांच्यापुढे निघून गेला. त्याला एका अनपेक्षित आवाजाने विचारले:

"पोरा, तू काय शोधतो आहेस?"

"सूर्यकुमारीला."

"तू सूर्यकुमारीशी सोयरीक करायला तर आलेला नाहीस?"

"आणि जर तसं असेल तर?" राजकुमार उत्तरला.

यावर हास्याचा आवाज आला.

"या तरुणाला आपल्या पाहुण्यांच्या खोलीत नेण्यात यावे," अशी त्या आवाजाने आज्ञा केली.

एका जोराच्या वावटळीसरशी राजकुमार एका अंधार कोठडीत येऊन पडला. त्या अंधार कोठडीला भिंतीत उंच छपराजवळ अगदी लहानशी हृदयाच्या आकाराची खिडकी होती. थोडचा वेळानंतर त्याचे डोळे अंधाराला सरावल्यावर त्याला कळले की, त्याच्या बरोबर इतर अठ्ठावीस म्हातारे त्या अंधार कोठडीत आहेत. ते सगळे भिंतीला टेकून जमिनीवर बसले होते.

राजकुमाराने त्यांना विचारले:

"तुम्ही कोण आहात आणि येथे काय करता आहात?"

त्यांच्यापैकी एकजण म्हणाला:

"आम्ही कसे दिसतो हे तू बघतोच आहेस. परंतु एके काळी आम्हीही तुझ्यासारखेच तरुण आणि निरोगी होतो. केव्हातरी आम्हीही जगाच्या निरनिराळ्या कानाकोपऱ्यातून सूर्यकुमारीशी सोयरीक करण्यासाठी आलो. मी येथे एकशे पंचवीस वर्षांपासून आहे. आणि आमच्यापैकी सर्वात ज्येष्ठ मनुष्य जवळ जवळ सहाशे वर्षे येथे आहे."

"तुम्ही शोक आवरा," राजकुमार म्हणाला. "आपण यातून काही मार्ग काढू."

त्याच वेळी कुणीतरी खिडकीवर टकटक करून काही मूठभर फुटाणे आत टाकले. जमिनीवरून फुटाणे तोंडाने वेचण्यासाठी सर्व म्हातारे जोरात धावले.

"तूही खा," त्यांनी सांगितले, "कारण फुटाणे हेच आपलं एकमेव अन्न-पाणी."



"फुटाणे तोंडाने वेचायला मी काही बदक नाही," राजकुमार उत्तरला.

कुणीतरी हाताने एक भांडेभर पाणी अंधार कोठडीत खिडकीतून दिले. परंतु राजकुमाराने ते ओढून घेऊन खिडकीतूनच बाहेर फेकून दिले.

"अरेरे तू हे काय केलेस!" म्हातारे कण्हत ओरडले. "आता आपल्याला उद्यापर्यंत पाणी मिळणार नाही."

राजकुमाराने मूठभर फुटाणे हिसकावून घेऊन खिडकीबाहेर भिरकावून लावले. नंतर राजकुमाराने त्याला बहिरीससाण्याने दिलेला रेशमी रुमाल बाहेर काढला आणि क्षणार्धात त्यांच्या पुढ्यात सर्व प्रकारची पंचपक्वान्ने वाढून आली. कैद्यांनी त्यांना खायला दिलेले फुटाणे बाहेर का फेकून दिले, हे खिडकीतून बघण्यासाठी सूर्यकुमारीची दासी गेली असता तिला रेशमी रुमालाची जादू बघून आश्चर्याचा धक्काच बसला व ती धावतच सूर्यकुमारीकडे गेली.

सूर्यकुमारीने आज्ञा केली: "नवीन आलेल्या कैद्याला तो मागेल ती किंमत देऊन तो रुमाल माझ्यासाठी घेऊन या."

सूर्यकुमारीच्या दासीने कोठडीच्या दाराशी येऊन तिची आज्ञा त्यांना सांगितली.

सूर्यकुमारीला रुमाल देऊ नये म्हणून सर्व म्हाताऱ्यांनी राजकुमाराची विनवणी केली:

"जर तू तो रुमाल दिलास तर तो आपल्या सगळयांचा आणि पर्यायाने तुझाही शेवटच असेल."

पण राजकुमाराने कुणाचेच एकले नाही. तो सूर्यकुमारीच्या दासीला म्हणाला:

"आत ये आणि रुमाल घेऊन जा. सूर्यकुमारीला सांग की, रुमाल तिचाच आहे. मी तिला चांगलं आरोग्य लाभावं अशी इच्छा करतो. आणि तिने नेहमी सुखी रहावं अशी प्रार्थना करतो. तिनेही माझ्याविषयी कधीतरी विचार करावा."

राजकुमाराने पाठविलेला निरोप ऐकून सूर्यकुमारीला हसूच आले. तिने रुमाल पसरवून काही सुग्रास पदार्थांचा आस्वाद घेतला. आणि मादक द्रव्यांचीही मौज लुटून ती उपरोधिक आनंदाने म्हणाली:

"आता त्या नवख्या तरुणाला इतरांप्रमाणे फुटाणे गिळण्याशिवाय गत्यंतर नाही."

परंतु दुसऱ्या दिवशीही राजकुमाराने फुटाणे खिडकीबाहेर फेकून दिल्यामुळे सूर्यकुमारीने तिची दुसरी दासी सायंतारा हिला एकंदर परिस्थितीचा मागोवा घेण्यासाठी पाठवले.

सायंताराने अंधार कोठडीत डोकावून बघितल्यावर तिला दिसले की, म्हातारे दारू पीत होते आणि सर्व प्रकारच्या पंचपक्वान्नांचा फडशा पाडीत होते. सोनेरी करंड्यातून मधुर संगीत ऐकू येत होते. तंतुवाद्य आणि सतारीचा आवाज येवढ्या जोरात येत होता की, त्यामुळे भिंतीसुद्धा थरथरत होत्या. खिडकीतून पुन्हा आवाज आला:

"तुमचा करंडा विकण्यासाठी तुम्हाला सूर्यकुमारीची आज्ञा आहे."

"आत ये आणि थोडा वेळ आमच्या बरोबर बैस आणि मग करंडा घेऊन जा."

सायंतारा आत आली. राजकुमाराने तिला एका दगडावर बसायला विनवले आणि आपल्या पुढ्यातील उंची मद्याच्या आणि स्वादिष्ट खमंग भोजनाचा तिला आस्वाद लुटू दिला. तिने मिष्टान्नावर आणि मद्यांवर ताव मारल्यावर तिची जेव्हा सूर्यकुमारीकडे परत जायची वेळ झाली तेव्हा तिला कळले की, आपण आपल्या जागेवरून उठू शकत नाही. तुम्हाला जर वाटत असेल की, उंची मद्याच्या सेवनाने तिला धुंदी आली असेल किंवा सुमधुर संगीताने तिला मोहून टाकले असेल, तर तुमची कल्पना पूर्णपणे चुकीची आहे. सत्य असे आहे की, सायंतारा ज्या दगडावर बसली होती त्या दगडाला राजकुमाराने आधीच आपली जादूची लापशी लावून ठेवलेली होती. आणि त्यामुळेच ती त्याला घट्ट चिकटली होती. सायंताराने गरगर फिरून दगडावरून सुटण्याचा प्रयत्न केला, तिने रडून रडून तेथून सोडविण्यासाठी राजकुमाराच्या विनवण्या केल्या. परंतु त्याने तिचे काही एक ऐकले नाही.



सूर्यकुमारीने अंधार कोठडीतून येणारे गाण्यांचे सूर आणि मधूर संगीत ऐकले. परंतु हा एवढा आनंद तेथे कशासाठी आहे आणि सायंतारा परत का आली नाही हे पाहण्यासाठी ती स्वत: अंधार कोठडीकडे आली. तिचे सौंदर्य येवढे दैदीप्यमान होते की, तिच्याकडे बघून आपले डोळे आंधळे होतील की काय असे वाटून सर्व म्हाताऱ्यांनी आपले डोळे स्वत:च्या हातांनी झाकून घेतले. तिला बघताच राजकुमाराचे हृदय धडधडू लागले.

"इथं काय चाललं आहे? अनोळखी तरुणा, तुझा सोनेरी करंडाच मी विकत घेते. या गैरशिस्त गोंधळाचे कारण तोच करंडा आहे. त्याची किंमत काय घेशील ते बोल."

"हे सौंदर्याची राणी, तुझ्या सौंदर्याने मी पुरता मोहित झालो आहे. तू ज्याची इच्छा करशील ते तुला मिळेल: सोनेरी करंडाच आणि सायंताराच काय, हा तुझा सेवकही तुझ्या सेवेसाठी हजर आहे."

"मला तिन्ही वस्तू हव्या आहेत," सूर्यकुमारीने सांगितले. तिने राजकुमाराच्या हातात आपला हात दिला. ती त्याला राजवाड्यात घेऊन गेली व त्याला सिंहासनावर बसवून म्हणाली:

"मी सूर्यकुमारी आहे, आणि तुम्ही माझे पती व्हा. माझ्या राजवाड्यात असलेल्या सर्व चाळीस खोल्यांच्या किल्ल्या मी तुम्हाला सोपवते. तुम्हाला कोठेही जायला आणि चाळीसपैकी एकोणचाळीस खोल्या उघडायला केव्हाही मुभा आहे. मात्र तुम्हाला जर माझ्या संगतीत सुखी व्हावयाचे असेल तर चाळीसाव्या खोलीचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करू नका."



राजकुमाराला राजवाडयात कुठल्याच प्रकारची काळजी नव्हती. तो इतका सुखी होता की, तो त्याच्या बहिणींच्या सुटकेविषयी विसरला. त्याने सूर्यकुमारीने कैद केलेले सर्व अठ्ठावीस कैदी मुक्त केले. नंतर त्याने राजवाडयाचा फेरफटका मारला. एका महालात चित्रविचित्र मासे ठेवलेले होते, तर दुसऱ्या महालात नऊ आवाजात गाणारे पक्षी होते, तर तिसऱ्या महालात स्वछंदपणे गोड आवाजात गाणारे नाकतोडे व रंगीबेरंगी पंखांची फुलपाखरे होती. प्रकाश आणि उष्णता यामुळे निर्माण होणारे सर्व प्रकारचे रंग, आवाज आणि सुवास सूर्यकुमारीच्या राजवाडयात एकत्रित झाल्यामुळे राजवाडा एकदम उजळून निघाला. तो काही जणू मधुर आवाजात गुणगुणतो आहे असे वाटत होते.

त्याच्या बायकोच्या राज्याचे सौंदर्य बघून राजकुमार कितीही दिग्मुढ झालेला असला तरी चाळीसाव्या गूढ महालाविषयी तो मिनीटभर देखील विसरू शकला नाही. एके दिवशी राजकुमाराने तो दणकट असा लोखंडी दरवाजा उघडला. राजकुमार काळजीपूर्वक आत शिरला, परंतु त्याला कुठलीही सजीव वस्तू दिसली नाही. फक्त शेवाळलेला भव्य खांब खोलीच्या मध्यभागी उभा होता. त्याला जाडजूड साखळदंडांनी खोलीच्या चारही कोपऱ्यांना जखडून ठेवले होते. तो परत जाण्यासाठी वळला, तोच खांब माणसाच्या आवाजात बोलू लागला:

"तरुण पोरा, माझ्यावर दया कर. त्या कोपऱ्यात पाण्याचा हौद भरलेला आहे. त्यातून पाणी घेऊन मला पाज."

राजकुमार परत फिरला. त्याला कोपऱ्यात पाण्याचा

मोठा हौद दिसला. हौदाशेजारी मोठी शिडी पडलेली होती. त्याने शिडी लावून हौदातील पाणी खांबाला प्यायला दिले. खांबाने ते पाणी पिऊन आणखी पाणी मागितले. राजकुमाराने पाणी आणताच तो ते एकाच घोटात पिऊन गेला. नंतर तो थोडासा हलला. त्याचे साखळदंड कचकचले आणि त्याने तिसऱ्या वेळेस पाणी मागितले, हेही तो पहिल्या दोन्ही वेळेसारखे घटाघटा प्याला. आणि आश्चर्य घडले: खांबाच्या अंगावरील साखळ-दंड जमिनीवर गळून पडले. त्याच्या अंगावरील शेवाळे खाली घसरले. खांब-राक्षस सरळ झाला. तो गडगडणाऱ्या आवाजात म्हणाला:

"हे तरुणा, मी तुझा अत्यंत आभारी आहे. आता सूर्यकुमारी माझीच आहे."

एकाद्या वावटळीसारखा क्षणार्धात तो त्याच्या कैदेतून छतावाटे बाहेर पडला आणि सूर्यकुमारीला घेऊन आकाश-मार्गे निघाला. राक्षस गेलेल्या दिशेने लहानशी ज्योती दिसत होती. आकाश काळवंडले, फारच थंडी जाणवू लागली. फुले तुटून झाडावरून खाली गळून पडली. भीती आणि क्रुरता यांचे सगळीकडे वातावरण पसरले. दाट जंगलात, खोल समुद्रात आणि लोकांच्या घरातही भीतीचे वातावरण पसरले. परंतु ह्यावेळी राजकुमाराएवढा दु:खी, कष्टी आणि उदास कुणी असू शकेल का? कारण त्यानेच नाही का पृथ्वीला ऊब, जीवन आणि फलधारणा देणाऱ्या आपल्या पत्नीच्या नशीबाशी खेळ केला? त्याने आता काय करावे? सूर्यकुमारीला कसे वाचवावे? त्याने खूप विचार केला. आणि तो त्याचे प्रेम, पत्नी आणि सर्व सुख हिरावून नेणाऱ्याचा शोध घेण्यासाठी राजवाड्या-

च्या तबेल्यातील सर्वोत्तम घोडयावर बसून क्षणार्धात वाऱ्याशी गोष्टी करू लागला.

राजकुमार तिसऱ्या दिवशी राक्षसाच्या किल्ल्याजवळ पोहोचला. राक्षस डाराडूर झोपलेला होता. तीन डोळयांचा एक बोकड सूर्यकुमारीवर लक्ष ठेवून होता. बोकडाला झोपवावे असे ठरवून राजकुमार त्याच्या जवळ बसला, त्याला झोपविण्यासाठी अंगाई गीत गाऊ लागला:

"तुझा डोळा बंद कर, बोकडा,
मित्रा, तुझा दुसराही डोळा बंद कर."

परंतु तो बोकडाच्या तिसऱ्या डोळयाविषयी पूर्णपणे बिसरला. बोकडाने त्याचे दोन्ही डोळे बंद केले, तो तिसऱ्या डोळयाने सर्व काही बघत होता. राजकुमाराने सूर्यकुमारीला घोडयावर बसवताच बोकड जोरात बें-बें आवाज काढून ओरडला:

"म्हातारबाबा, म्हातारबाबा, ते तुझा खजीना लुटून नेत आहेत."

त्याने तिसऱ्यांदा ओरडल्यानंतरच राक्षस उठला. तो बडबडला:

"आपणापाशी पुष्कळ वेळ आहे. आपण प्रथम थोडे बटाटे खणून काढू आणि मग त्याच्या मागे जाऊ."

राजकुमार आणि सूर्यकुमारी पुष्कळ अंतर कापून गेल्यावर राक्षस त्याच्या तीन डोळयांच्या बोकडावर त्यांच्या मागावर निघाला, राक्षस उंच उडाला आणि त्याने खाली येऊन त्यांचा रस्ता रोखून तो म्हणाला:

"राजकुमारा, तू पाणी पाजून मला जीवदान दिल्यामुळे

मी तुला मारणार नाही. परंतु तू जर पुन्हा असला बेतालपणा केलास, तर तुला पश्चात्ताप करावा लागेल."

राक्षसाने जोरात शिटी मारून सूर्यकुमारीला त्याच्या बोकडावर बसविले व तो जोरात माघारी निघाला. तेवढ्यातल्या तेवढ्यात सूर्यकुमारीने जादूचा सुती चेंडू आपल्या नवऱ्याकडे फेकला.

राजकुमाराने त्याच्या बायकोला सोडवण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न केला. तो पुन्हा बोकडाच्या तिसऱ्या डोळ्याविषयी विसरला. बोकडाने ओरडून त्याच्या मालकाला उठविले:

"म्हातारबाबा, म्हातारबाबा, ते तुमचा खजिना लुटून नेत आहेत."

आपले मैलाच्या दगडाएवढे डोळे उघडून राक्षस म्हणाला:

"काळजी करू नकोस. आपण आधी खणलेल्या बटाट्यांची भाजी करून त्या लुच्च्या उडाणटप्पू तरुणाला गाठण्याएवढा वेळ आपल्याजवळ आहे."

राजकुमार आणि त्याची बायको राजवाड्यावर पोहोचणार एवढ्यात बोकडावरून दोन्ही बाजूला पाय पसरून राक्षसाने त्यांचा रस्ता अडविला. मेल्यातच जमा असलेल्या सूर्यकुमारीला धरून राक्षस त्याच्या राज्याकडे नेऊ लागला. तरीही तिने जादूचा रुमाल राजकुमाराकडे फेकला. राक्षसाने राजकुमाराच्या डोक्यावर सोटा मारला. आणि राजकुमार जागीच मरून पडला.

आकाशातून गिधाडे येऊन त्याच्याभोवती जमा होऊ लागली. क्षणार्धात बहिरीससाणा प्रकट झाला. त्याने सर्व गिधाडांना हुसकून लावले, सूर्यकुमारीच्या राजवाड्यातून जिवंत करण्याचे पाणी आणून राजकुमाराच्या तोंडात



टाकले. राजकुमार ताबडतोब शुद्धीवर आला. बहिरीससाणा त्याला म्हणाला :

"तू साध्या घोड्यावर बसून सूर्यकुमारीला कधीच सोडवू शकणार नाहीस. तुला त्यासाठी लाऊमे चेटकिणीचा गुराखी बनावे लागेल. आणि तिचं मांजर ज्या काही गुप्त गोष्टी सांगेल त्या ऐकाव्या लागतील. राक्षसाचा प्राण समुद्रात असलेल्या एका बदकाच्या अंड्यात आहे. तू जर चेटकिणीच्या घोड्यावर बसून तेथे गेलास आणि बदकापासून अंडे मिळविण्यात यशस्वी झालास तर ते अंडे फोडताच इकडे राक्षस मरून पडेल. सुती चेंडू तुला लाऊमे चेटकिणीच्या राज्यात नेऊन सोडील. जेव्हा काही अडचण येईल तेव्हा तुझा जादूचा रुमाल काढ आणि आम्ही तुझ्या मदतीला धावून येऊ."

राजकुमाराने सुती चेंडू फेकला. तिसऱ्या दिवशी तो एका जुनाट जळमटांनी वेढलेल्या पडक्या झोपडीशी येऊन थांबला. तोंडाचा बोळका झालेल्या म्हाताऱ्या लाऊमे चेटकिणीने दारातच राजकुमाराला अडवून विचारले :

"मुला, तू कुठे निघाला आहेस?"

"काम शोधण्यासाठी."

"माझ्याबरोबर राहून माझ्या बारा घोड्यांना तू तीन दिवसांसाठी चरायला ने आणि त्यांना जर संध्याकाळी तू सुरक्षित घरी आणले तर तिसऱ्या दिवशी तुझ्या आवडीची माझ्याकडे असलेली कोणतीही वस्तू मी तुला देईन. मात्र त्यातली एकही घोडी जर हरवली तर मी तुला जिवंत ठेवणार नाही. आता आत ये आणि जेवण करून घे."

राजकुमार जेवत असतांना एक हिरव्या डोळ्यांचे मांजर त्याच्या मांडीवर येऊन बसले व म्हणाले :

"राजकुमारा, तू खात असलेल्या मांसाचा चांगल्यापैकी तुकडा मला दिलास तर मी तुला सर्व प्रकारची मदत करीन."

राजकुमाराने स्वत:च्या ताटातील मांसाचे थोडे तुकडे टेबलाखाली फेकले. ते खाऊन मांजर म्हणाले:

"सर्व घोड्या लाऊमे चेटकिणीच्या मुली आहेत. मी जाऊन बघते की, तुला फसविण्यासाठी त्या कुठल्या प्रकारची योजना आखत आहेत."

नंतर ते राजकुमाराला म्हणाले की, चेटकिणीने तिच्या मुलींना लहान माशांचे रूप घेऊन तळ्यातील खोल पाण्यातील शेवाळ्यामध्ये लपून बसायला सांगितले आहे.

दुसऱ्या दिवशी लाऊमेने तिच्या नव्या गुराख्याला उठवले आणि त्याच्याबरोबर भाकरीच्या तुकड्याची शिदोरी बांधून देऊन त्याला घोड्या चारण्यासाठी पाठवले.

राजकुमाराने जंगलात, कुरणात आणि नदी किनारी घोड्या चारल्या. थोड्या वेळाने राजकुमाराला जोरदार भूक लागली. म्हणून लाऊमेने दिलेली शिदोरी त्याने खाल्ली व त्यामुळे आलेल्या सुस्तीने तो तेथेच झोपी गेला. तो तेथे झोपलेला असतांना सर्व घोड्या नदीत सटकल्या. आणि त्यांनी लहान लहान माशांची रूपे धारण केली. राजकुमार जागा झाल्यावर त्याने चारही बाजूला पाहिले, पण त्याला एकही घोडी दिसली नाही.

राजकुमाराने खिशातून जादूचा रुमाल काढून पसरताच पाईक मासा प्रगट झाला.

"लाऊमेने तिच्या मुलींना कुठल्या रूपात लपवले आहे?"

"माशांच्या" राजकुमार म्हणाला.

पाईक माशाने ताबडतोब खेकड्याचे रूप घेऊन तो

चेटकिणीच्या मुलींच्या मागे लागला. चेटकिणीच्या मुलींना परत घोडीचे रूप घेण्याशिवाय इलाज उरला नाही. राजकुमाराने सगळ्यांना घरी हाकून आणले. लाऊमेने सगळ्यांना परत आलेल्या पाहून त्यांची अंगणातच चांगली खरडपट्टी काढली.

"तुम्ही त्या गुराख्याचं ऐकून नुसत्या झुडूपांमध्ये मिरवत राहिलात!"

चेटकिणीची एकसुद्धा मुलगी राजकुमाराचा डोळा चुकवून नीट लपू शकली नाही व राजकुमाराने त्यांना परत बरोबर हाकून आणल्यामुळे चेटकिणीच्या रागाला पारावार उरला नाही.

रात्री झोपेपर्यंत चेटकीण तिच्या मुलींना मारत होती. शेवटी तिने त्यांना आज्ञा केली की, उद्या तुम्ही सर्वजणी सुतार पक्षिणींचे रूप घेऊन झाडांच्या ढोल्यामध्ये लपून रहा. पण मांजरीने हे ऐकून राजकुमाराला सर्व सांगितले.

दुसऱ्या दिवशीही राजकुमाराने चेटकिणीने दिलेल्या शिदोरीची न्याहरी करताच तो जागीच झोपी गेला. सर्व घोड्यांनी सुतार पक्षिणींचे रूप घेऊन त्या झाडांच्या ढोल्यांमध्ये लपल्या. राजकुमार जागा झाला आणि त्याने जादूचा रुमाल हवेत हलविताच तेथे बहिरीससाणा उडत आला. त्याने सर्व हकीकत विचारली आणि घारीचे रूप घेतले. त्याने सर्व सुतार पक्षिणींना धरून त्यांच्या चिंध्या चिंध्या करायला सुरुवात केली. म्हणून त्यांना घोड्याचे रूप घेण्याशिवाय इलाज उरला नाही. राजकुमाराने सगळ्यांना घरी हाकारून आणले. लाऊमेची आणि त्यांची फाटकाशी गाठ पडली. तिने राजकुमाराच्या हातून चाबूक हिसकावून घेऊन घोड्यां-

च्या डोक्यावर व डोळ्यांवर फडाफड फटकारे मारायला सुरुवात केली :

"नालायक मुलींनो, उद्या तुम्ही लहान लहान ढेकणाचं रूप घेऊन झाडांच्या सालींच्या फटीत लपून रहा."

मांजराने ह्या सर्व गोष्टी ऐकून त्या जशाच्या तशा त्याच्या मित्राला, राजकुमाराला, सांगितल्या. परंतु त्या ढेकणांना आपण कसे पकडू ह्या चिंतेतच त्याला रात्रभर झोप लागली नाही. पण बहिरीससाणा उडत उडत आला आणि त्याने सुतार पक्ष्याचे रूप घेतले व झाडांच्या फटीतील ढेकूण काढायला सुरुवात केली. शेवटच्या दिवशीही राजकुमाराने घोड्यांना हाकारून घरी आणले. लाऊमेने त्यांना बघताच, संतापाने त्यांना चाबकाने ओरबाडून काढायला सुरुवात केली. नंतर ती अत्यंत मधुर आवाजात राजकुमाराला म्हणाली :

"आता झोप आणि उद्या माझ्यापाशी असलेल्या वस्तूंपैकी तुला जी वस्तू पसंत पडेल ती तू घेऊन जा."

"मला फक्त तुमच्या शिंगींमधली सगळ्यात लहान शिंगी हवी आहे."

तबेल्याच्या एका कोपऱ्यात मांजरापेक्षाही लहान शिंगी पडली होती.

लाऊमे म्हणाली : "अशी दमलेली शिंगी तुला काय कामाला येईल?"

परंतु राजकुमाराने तिचे काही एक न ऐकता त्या लहान शिंगीला बगलेत घालून तो चालू लागला. लाऊमे तापात असल्यासारखी थरथरायला लागली. कारण ती शिंगी काही साधारण शिंगी नव्हती, ती तिची सगळ्यात आवडती नात होती. तिच्यात बारा शिंग्यांचे बळ होते. प्रत्येक

पावलागणिक शिंगीचे वजन व आकारमान वाढू लागले. एक मैल चालून गेल्यावर तो सहजच तिच्या पाठीवर बसून जाऊ लागला आणि आठ मैल चालून गेल्यावर ती माणसाच्या आवाजात बोलू लागली :

"तुला कुठे जावयाचे ते तू मला सांग ?"

"मला समुद्रावर जाऊन तेथे बदकीला धरून तिचं अंडं मिळवायचं आहे."

"ठीक आहे," असे म्हणत शिंगीने आकाशात एवढ्या जोरात भरारी मारली की, तिच्या खुरांनी ढगांवर ठिणग्या पडत होत्या. ती वाऱ्यापेक्षाही वेगाने उडत होती. थोड्याच वेळात ते समुद्राकाठी उतरले. तेथे समुद्राच्या लाटा पिवळे स्फटीक काठावर आणून टाकत होत्या. दूरवर समुद्रात बदकी एकाद्या ठिपक्याप्रमाणे पाण्यात बुड्या मारण्याचा खेळ खेळतांना दिसत होती. राजकुमाराजवळ धनुष्य किंवा बाण काहीच नव्हते. आणि तो नुसत्या हातांनीही बदकीला धरू शकत नव्हता. तो समुद्राच्या पांढऱ्या वाळूवर बसून हमसून हमसून रडू लागला. आणि एवढ्यातच पाईक मासा समुद्रातून डोके वर काढून त्याला म्हणाला :

"राजकुमारा, रडू नकोस. मी तुझ्यासाठी ती बदकी धरून आणतो."

पाईक माशाने तिला राजकुमाराजवळ आणले. राजकुमाराने बदकीला धरून तिचे दोन तुकडे केले आणि राक्षसाचा जीव असलेले अंडे त्यातून काढले. ते अंडे सदऱ्याच्या खिशात ठेवून त्याने त्याच्या शिंगीवर मांड ठोकली आणि तो लांबवर दिसणाऱ्या जाळाच्या दिशेने निघाला. तेथेच त्याची सूर्यकुमारी कैदेत दिवस काढीत होती. त्याने राक्षसाच्या किल्ल्यांचा दरवाजा ठोठावला आणि म्हणाला :

"भयंकर विद्रुप राक्षसा, बाहेर ये. मी माझ्या बायकोला सोडवायला आलो आहे."

भयंकर राक्षस त्याचा सोटा हलवतच दरवाजातून बाहेर आला :

"हे कवडी मोलाच्या तरुणा, माझ्या नजरेपासून दूर जा, नाही तर मी तुला मारून टाकीन, तुझे प्रेत जाळून ती राख वाऱ्याबरोबर उडवून देईन."

"तू तसं करू शकणार नाहीस." राजकुमार उत्तरला आणि त्याने अंडे जोरात जमिनीवर आपटले. अंडे फुटताच राक्षसाच्या तोंडातून निघणारे शिवराळ शब्द त्याच्या तोंडातच राहिले. तो त्याच क्षणी नाहीसा झाला. सूर्यकुमारी धावतच आली. तिने राजकुमाराला प्रेमाने आलिंगन दिले. त्याच क्षणी सर्व पृथ्वी प्रकाशाने न्हाऊन निघाली. सगळीकडे फुले उमलली. सूर्यकुमारीने इंद्रधनुष्य आकाशात उधळून तिचा लग्न सोहळा साजरा केला. तिच्या सुटकेच्या आनंदात तिने मेजवानी दिली. राजकुमारानेही त्याच्या बहीण, मेहुण्यांच्या आणि इतके दिवस त्याच्याकडून काहीच बातमी न मिळाल्यामुळे शोकसागरात बुडून गेलेल्या त्याच्या आईवडिलांच्या गोष्टी सांगितल्या. अत्यंत दयाळू सूर्यकुमारीने बहिरीससाणा, अस्वल व पाईक मासा यांना पुन्हा माणसाचे रूप दिले. राजकुमार व त्याच्या कुटुंबियांना पाच रथांमध्ये बसवून ती त्यांच्याबरोबर आईवडिलांच्या भेटीला निघाली.

तुम्हाला आश्चर्य वाटत असेल की त्या पाचव्या रथात कोण होते. त्यात दुसरे तिसरे कुणी नसून सूर्यकुमारी आणि राजकुमार यांचा मुलगा चांदोबा होता.

माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे.

आमचा पत्ता: 'रादुगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को ११९०२१, सोविएत संघ.